मुख्य कार्यालय, विरार
यशवंत नगर, विरार (प),
ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ ३०३

दूरध्वनी : २५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcoprporation@yahoo.com

जा.क्र. : व.वि.श.म./आस्था/१११२/२०२६
दिनांक : २० /०८/२०२६

## "जाहिर दरपत्रक"

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापना विभागामध्ये खाली उल्लेख केल्याप्रमाणे काम करावयाचे असून सदर काम करण्यास इच्छुक संस्था/वेतन लेखापरीक्षक यांनी त्यांच्या लेटरपॅडवर खालील उल्लेख केलेल्या कामाचे दर (सर्व करांसहित) दि.०१.०९.२०२६ रोजी दु. 3.00 वा. पर्यंत वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, आस्थापना विभाग, विरार (प.) यांच्या आवक बारनिशीकडे सादर करण्यात यावेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | दर (रूपये) (सर्व करांसहित) | |
|---|---|---|---|
| | | अंकात | अक्षरात |
| 1. | वसई विरार शहर महानगरपालिकेतील बाह्ययंत्रणेद्वारे नियुक्त केलेले अस्थायी कर्मचारी तसेच ठोक मानधनावरील कर्मचारी व बाह्ययंत्रणेद्वारे शहरातील सफाई करणेकामी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनाप्रमाणे देण्यात येणारे वेतन, वेतन दिल्याबाबतचे बँक स्टेटमेंट, वेतनातून कपात केलेल्या ई.पी.एफ., ईएसआयसी, महाराष्ट्र लेबर वेल्फेअर फंड, उपदान, रजेचे वेतन, इत्यादी अनुषंगिक कामे करणे वेतन लेखापरीक्षक म्हणून काम पाहणे. | 5,00,000/- मर्यादेत | पाच लक्ष मर्यादेत |
| 2. | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कार्यादेश दिल्यापासून 1 वर्षापर्यंत | |
| 3. | इसारा रक्कम | रु.5,000/- | |

### -: अटी-शर्ती :-

1. दरपत्रक सीलबंद लिफाफ्यात सादर करावे. लिफाफ्यावर कामाचा विषय स्पष्ट नमूद करावा.
2. दरपत्रक सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ यानंतर प्राप्त झालेले दरपत्रक ग्राह्य धरले जाणार नाही.
3. दरपत्रकधारकास EPF, ESIC, P.T., Gratuity, Leave Wages, Bonus व इतर Labour Law Compliance बाबत पुरेसा अनुभव असावा.
4. सर्वात कमी दर (L1) देणाऱ्या पात्र दरपत्रकधारकास प्राधान्य देण्यात येईल. तथापि, गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन अंतिम निर्णय घेण्यात येईल.
5. आवश्यक कागदपत्रे जसे की जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र (असल्यास), पॅन कार्ड, दुकाने व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र इत्यादी जोडणे आवश्यक राहील.
6. महानगरपालिकेस कोणतेही अथवा सर्व दरपत्रके स्विकारण्याचा किंवा नामंजूर करण्याचा अधिकार राहील.
7. दरपत्रकाबाबत कोणताही वाद उद्भवल्यास महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.

उप-आयुक्त (आस्थापना)
वसई विरार शहर महानगरपालिका